महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ १० जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १९५ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### लोकशाहीच्या उत्सवात कर्मचाऱ्यांची गैरहजेरी ?

**“मतदान केंद्रावर उभा असलेला कर्मचारीही माणूसच आहे; त्याचा ताण समजून घेतला नाही, तर गैरहजेरी वाढणारच.”**

लोकशाहीच्या प्रक्रियेत निवडणूक ही अत्यंत महत्त्वाची आणि संवेदनशील जबाबदारी असते. या प्रक्रियेचा कणा म्हणजे निवडणूक कर्मचारी. मतदान केंद्रांवरील शिस्त, पारदर्शकता आणि विश्वासार्हता मोठ्या प्रमाणात त्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. मात्र, अलीकडे काही महानगरपालिका निवडणुकांमध्ये निवडणूक कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीचे प्रमाण वाढल्याचे चित्र दिसत आहे. निवडणूक काळात विविध शासकीय, निमशासकीय तसेच खासगी आस्थापनांतील कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. काही कर्मचाऱ्यांनी वेळेवर हजर न राहणे, गैरसमज, वैयक्तिक अडचणी किंवा माहितीअभावी अनुपस्थित राहणे, ही कारणे पुढे येत आहेत. ही स्थिती केवळ शिस्तभंग म्हणून न पाहता, व्यवस्थापनातील संवाद आणि समन्वय सुधारण्याची गरज म्हणून पाहिली जाणे अधिक योग्य ठरेल.

प्रशासनाने याबाबत गांभीर्याने दखल घेत, नोटीस देणे, संपर्क वाढवणे आणि पर्यायी व्यवस्था उभारणे अशी पावले उचलली आहेत. ही कारवाई केवळ दंडात्मक न राहता, जबाबदारीची जाणीव करून देणारी ठरावी, अशी अपेक्षा आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासनाची तयारी, दक्षता आणि तत्परता महत्त्वाची ठरते. दुसरीकडे, कर्मचाऱ्यांनीही लोकशाहीतील आपली भूमिका ओळखून निवडणूक कामकाजाला प्राधान्य देणे गरजेचे आहे. निवडणूक ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून, लोकशाहीचा उत्सव आहे. या उत्सवात प्रत्येक घटकाचा सहभाग तितकाच आवश्यक आहे. एकूणच, निवडणूक कर्मचाऱ्यांची गैरहजेरी ही प्रशासनाचे अपयश म्हणून लेबल लावण्याऐवजी, सुधारणा, संवाद आणि शिस्तीच्या समतोलातून तोडगा काढण्याची संधी म्हणून पाहिली पाहिजे. योग्य नियोजन, वेळेवर माहिती आणि परस्पर सहकार्य यातूनच ही प्रक्रिया अधिक सक्षम आणि विश्वासार्ह होऊ शकते.

थोडक्यात; अतिरिक्त जबाबदाऱ्या, अपुरा संवाद आणि वाढता ताण हे या कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीच्या वास्तवाचं प्रतिबिंब आहे.” निवडणूक यशस्वी होण्यासाठी शिस्त आवश्यकच, पण कर्मचाऱ्यांवरील ताण कमी करणारी यंत्रणाही तितकीच गरजेची आहे, असे वाटते...




## महत्वाचे

### आयुक्त सौरभ राव यांचा इशारा

#### निवडणूक कामावर गैरहजेर दोन हजार कर्मचाऱ्यांना फौजदारीची कारवाई नोटीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महापालिका निवडणुकीसाठी ११ हजार ५०० अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असली, तरी त्यापैकी अद्याप २ हजार १२८ अधिकारी व कर्मचारी नेमणुकीच्या ठिकाणी हजर न झाल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने संबंधित कर्मचाऱ्यांना नोटिसा बजावत फौजदारी कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. निवडणूक कामासाठी गैरहजर राहिल्यामुळे अनेक कर्मचारी अडचणीत आल्याचे चित्र आहे. ठाणे महापालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान, तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीसाठी शहरातील ३३ प्रभागांमध्ये २ हजार १३ मतदान केंद्रे असून, राखीव कर्मचाऱ्यांसह एकूण ११ हजार ५०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी क्रमांक १, २ व ३ तसेच शिपाई यांचा समावेश आहे. हे सर्व कर्मचारी विविध शासकीय व निमशासकीय आस्थापनांमध्ये कार्यरत आहेत. प्रारंभी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांपैकी ३ हजार ६४१ अधिकारी व कर्मचारी निवडणूक कामावर रुजू झाले नव्हते. याची गंभीर दखल घेत महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार महापालिकेने नोटिसा बजावत कारवाईचा बडगा उगारला असून, त्यानंतर काही कर्मचारी रुजू झाले आहेत. मात्र अद्यापही २ हजारांहून अधिक कर्मचारी गैरहजर असल्याने प्रशासनाकडून कठोर कारवाईची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### वसईत दोन दिग्गज माजी नगरसेवकांमध्ये लढत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** वसई-विरार महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग समिती क्रमांक ४ मध्ये चुरशीची आणि लक्षवेधी लढत होण्याची चिन्हे आहेत. मागील निवडणुकीत एकत्र सत्तेत असलेले माजी स्थायी समिती सभापती अजीव पाटील आणि माजी नगरसेवक महेश पाटील यंदा परस्परांविरोधात निवडणूक लढवत आहेत. बहुजन विकास आघाडीचे सर्वेसर्वा हितेंद्र ठाकूर यांचे निकटवर्तीय मानले जाणारे महेश पाटील यांनी निवडणुकीपूर्वी बविआला रामराम करत भाजपमध्ये प्रवेश केला असून, भाजपने त्यांना प्रभाग क्रमांक ४ मधून उमेदवारी दिली आहे. दुसरीकडे, बविआकडून माजी महापौर राजीव पाटील यांचे बंधू आणि माजी स्थायी समिती सभापती अजीव पाटील यांना उमेदवारी देत भाजपसमोर मोठे आव्हान उभे करण्यात आले आहे.

# कुळगाव-बदलापूरची सत्तासूत्रे महिलांच्या हाती !

## भाजप-राष्ट्रवादी युतीचा प्रभाव ■ उपनगराध्यक्षपदी प्रियंका दामले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर, ता.9 : कुळगाव-बदलापूर नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदाची निवड शुक्रवारी जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार पार पडली. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या प्रियंका दामले यांची बिनविरोध निवड झाली. यापूर्वी नगराध्यक्षपदी भाजपच्या रुचिता घोरपडे यांची थेट जनतेतून निवड झाल्याने नगर परिषदेत नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष अशी दोन्ही पदे महिलांकडे आली असून शहराचा कारभार महिलांच्या नेतृत्वाखाली चालणार आहे.**



शिवसेनेकडून नगर परिषदेतील सर्व निवडणुकांमध्ये उमेदवार देण्यात येतील, अशी घोषणा करण्यात आली होती. मात्र उपनगराध्यक्षपदासाठी शिवसेनेकडून उमेदवारी अर्ज दाखल न झाल्याने प्रियंका दामले यांची बिनविरोध निवड झाली.

दरम्यान, कुळगाव-बदलापूर नगर परिषदेच्या निवडणुकांमध्ये भाजपने सुरुवातीपासूनच नियोजनबद्ध रणनीती राबवली. निवडणुकांची चाहूल लागताच भाजपचे आमदार किसन कथोरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षासोबत युती जाहीर केली. या युतीअंतर्गत परशुराम आर्थिक विकास मंडळाचे अध्यक्ष मंत्री आशिष दामले यांना उपनगराध्यक्षपदासह एक स्वीकृत सदस्यपद देण्याचे आश्वासन भाजपकडून देण्यात आले होते. यानुसार राष्ट्रवादी काँग्रेसला आठ जागा देण्यात आल्या, तर उर्वरित जागांवर भाजपने निवडणूक लढवली. राष्ट्रवादी काँग्रेसला तीन जागांवर यश मिळाले. या युतीच्या जोरावर भाजपला नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत मोठी आघाडी मिळाली असून, त्याचा फटका शिवसेनेच्या उमेदवाराला बसल्याचे चित्र आहे.

# अंबरनाथ नगरपरिषदेत शिवसेना-राष्ट्रवादीची सत्ता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : अंबरनाथ नगरपरिषदेवर भगवा फडकणार असून शिवसेना सत्ता स्थापन करणार आहे. अंबरनाथ नगरपरिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या चार नगरसेवकांनी आणि एक अपक्षाने शिवसेनेला पाठिंबा दिला आहे. अंबरनाथमध्ये शिवसेना 27 जागांवर सर्वात मोठा पक्ष आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या चार आणि अपक्ष नगरसेवकाच्या पाठिंब्यासह शिवसेनेचे संख्याबळ 32 पर्यंत वाढणार आहे. यामुळे अंबरनाथमधील राजकीय समिकरणं बदलणार आहेत.**

**शिवसेना शिंदे - 27**
**राष्ट्रवादी - 04**
**अपक्ष - 01**
**भाजप - 16**
**काँग्रेस - 12**
**(यातील 10 जण भाजपमध्ये गेले)**




अंबरनाथच्या जनतेने विकासाला मतदान केले. त्यामुळेच शिवसेना 27 जागांसह सगळ्यात मोठा पक्ष म्हणून नगर पालिकेत समोर आला. भाजप-काँग्रेस आघाडीला अंबरनाथ जनतेने नाकारले असून त्यांचा विकासाचा कौल मान्य करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या 4 आणि एका अपक्ष नगरसेवकांने शिवसेनेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. या पाठिंब्यानंतर शिवसेनेचे संख्याबळ 32 पर्यंत वाढले असून बहुमताचा आकडा पार केला आहे. राष्ट्रवादी आणि अपक्ष नगरसेवकाच्या पाठिंब्यासह शिवसेनेकडून अंबरनाथमध्ये सत्ता स्थापनेचा दावा केला जाणार आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे सत्ता स्थापनेबाबत पत्र देण्यात आलं आहे. त्यामुळे अंबरनाथ नगरपरिषदेवर आता शिवसेना आणि राष्ट्रवादीची सत्ता येणार हे निश्चित झालं आहे.

**काँग्रेसच्या फुटीर नगरसेवकांसोबत सत्ता स्थापनेचे स्वप्न पाहणाऱ्या भाजपला श्रीकांत शिंदे यांनी धक्का दिल्याची चर्चा आहे. भाजपच्या खेळीनंतर सर्वाधिक जागा निवडून आलेल्या शिंदेंच्या शिवसेनेत मात्र खळबळ उडाली त्यामुळे श्रीकांत शिंदे यांनी खेळी करत अजितदादांच्या गटाला सोबत घेतलं. शिवसेनेचे सर्व नगरसेवक ठाण्यातील आनंद आश्रम या ठिकाणी गोळा झाले. त्यानंतर शिंदे यांनी शिवसेनेचे 27, अजितदादांचे चार आणि एका अपक्षाच्या मदतीने त्यांनी सत्ता स्थापनेचा दावा केला असून तसे पत्र जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलं आहे.**



# स्वीकृत नगरसेवक निवडीत पराभूतांना संधी

## शिवसेनेतील धुसफूस चव्हाट्यावर गटनेत्यांच्या राजीनाम्याची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : शुक्रवारी कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या स्विकृत सदस्यांची निवड प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत शिवसेनेने निवडणुकीत पराभूत झालेल्या उमेदवाराला स्विकृत सदस्य म्हणून संधी दिल्याने दोन नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली. यावेळी त्यांनी थेट गट नेत्यांचा राजीनामा मागितला. तर ज्यांचे पक्षासाठी योगदान नाही, जे आताच पक्षात आले त्यांना कशी संधी दिली जाते, असा प्रश्नही या नाराज नगरसेवकांनी उपस्थित केला. याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार करणार असल्याचेही या नाराजींनी स्पष्ट केले आहे.

कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत शिंदेंच्या शिवसेनेचे सर्वाधिक २४ नगरसेवक विजयी झाले. मात्र नगराध्यक्ष पदाच्या निवडीत भाजपने बाजी मारली. त्यामुळे शिंदेंच्या शिवसेनेच्या हातची सत्ता गमवावी लागली. यात भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी (अजित पवार) निवडणूक पूर्व युती करून सत्तेचा आकडाही गाठला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या तीन नगरसेवकांमुळे भाजपच्या गटाची बेरीज शिवसेनेपेक्षा एकने अधिक आहे. त्यामुळे एक अधिकचा स्विकृत नगरसेवक त्यांना मिळाला.

या आकडेवारीनुसार गट स्थापन झाल्यानंतर शुक्रवारी बदलापूर नगर परिषदेत स्विकृत नगरसेवकांची निवड प्रक्रिया संपन्न झाली. यात शिवसेनेने पराभूत झालेले हेमंत चतुरे आणि दिलीप बैकर यांना संधी दिली. हेमंत चतुरे हे काही महिन्यांपूर्वी भाजपातून शिंदेंच्या शिवसेनेत आले होते. त्यामुळे शिवसेनेच्या बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेविका शीतल राऊत यांनी या प्रक्रियेवर नाराजी व्यक्त केली. त्यांनी माध्यमांशी बोलताना हा प्रकार अन्यायकारक असून पक्षात कालपरवा आलेल्या आणि पक्षाचे तिकिट घेऊन २ हजार ७५० मतांनी पराभूत झालेल्या आणि संपूर्ण प्रभागात पराभव झालेल्या उमेदवारांना कशी काय संधी मिळते, असा प्रश्न उपस्थित केला.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भिवंडीत तीनशेहून अधिक परवानाधारकांची शस्त्रे पोलिसांकडे जमा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहर महानगर पालिकेची सार्वत्रिक निवडणूकीसाठी 15 जानेवारीला मतदान होणार आहे. त्यामुळे महानगरपालिका प्रशासन व पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून त्यांनी निवडणूक मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी तयारी सुरू केली आहे. ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या आदेशानुसार भिवंडीत निवडणूक निमित्ताने भिवंडी पोलीस उपआयुक्त शशिकांत बोराटे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक व सहाय्यक पोलीस आयुक्त अधिकारी वर्गाची विशेष बैठक घेऊन समाजकंटकांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत त्यानुसार कारवाई सुरू झाली आहे. तसेच पोलिसांनीं विविध प्रतिबंधक कारवाई करीत ३०५ परवानाधारक शस्त्रे जमा केली आहेत.

भिवंडी महापालिका सार्वत्रिक निवडणूक निमित्ताने प्रचाराची रणधुमाळी जोमात सुरू झाली असुन ठिकठिकाणी शिवीगाळ व हाणामारी चे प्रकार होत असल्याने पोलीस यंत्रणा सतर्क झाली असुन शहर परिसरात शांतता भंग होऊ नये म्हणून पोलिसांकडून प्रतिबंधक कारवाई केली जात आहे. त्या अंतर्गत भिवंडी पोलीस उपायुक्त शशिकांत बोराटे यांनी कारवाई करीत भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील ३०५ परवानाधारक व्यक्तीकडून त्यांचे शस्त्र जमा केले तसेच निवडणूक जाहीर झाल्यानंतर केलेल्या कारवाई दरम्यान ५३० जणांवर प्रतिबंधक कारवाई केली आहे. तर २४ गुन्हेगारांवर कारवाई करीत त्यांच्यावर विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहे. त्या अंतर्गत १० अग्निशस्त्रे, १६ धारदार हत्यार पोलिसांनी जप्त केले तर एकावर एमपीडी कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली.तसेच एकूण ५ गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले. शहरातील विविध गावठी दारूच्या अड्डयावर धाडी टाकून ३४ जणांवर गुन्हे दाखल करून पोलिसांनी २५७४ लिटर दारू जप्त केली आहे. पोलिसांनी निवडणूक काळात केलेल्या या कारवाईचा गुन्हेगारांनी धसका घेतला असून त्याचा निवडणूक शांततेत पार पडण्यास मदत होणार आहे.

भिवंडी शहरातील विविध प्रभागात निवडणूक प्रचार निमित्त करून रात्रीच्या वेळी काही संशयित व्यक्त फिरत आहेत. तर काही ठिकाणी रात्री उशिरापर्यंत काळ्या काचा लाऊन गाडया रस्त्यावर फिरत असतात त्यामुळे लोकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही राजकीय व अपक्ष उमेदवारांकडून गुपचूप प्रचार व बैठका घेत असुन अनेक ठिकाणी आचारसंहिता भंग होत आहे. रात्रीच्या वेळी हॉटेल व हातगाडयावर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असुन त्या ठिकाणी शाब्दिक बाचाबाची होत आहे त्यामुळे रात्रीच्या वेळी सार्वजनिक रस्त्यावर गर्दी करणाऱ्या लोकांवर महापालिका आचारसंहिता पथक व पोलिसांनी कारवाई करावी अशी मागणी होत आहे.






# जनसेवा प्रतिष्ठानच्या कला-क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : जनसेवा प्रतिष्ठान मुरबाड यांच्या वतीने आयोजित कला व क्रीडा महोत्सव २०२६ चे उद्घाटन मुरबाड शहरात भव्य व उत्साहपूर्ण शोभायात्रेने पार पडले. या शोभायात्रेला मुरबाड विधानसभेचे आमदार किसनजी कथोरे, केंद्रीय माजी राज्यमंत्री कपिल पाटील व सिडकोचे माजी अध्यक्ष हिंदुराव यांच्या उपस्थितीमुळे विशेष शोभा प्राप्त झाली. उद्घाटन कार्यक्रमास कार्यक्रमाचे अध्यक्ष गोटीराम भाऊ पवार व जनसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुभाष गोटीराम पवार उपस्थित होते.

शोभायात्रेत मिलिटरी स्कूलची शिस्तबद्ध परेड, लोकनागरी विद्यालयाचे लेझीम पथक, शांताराम भाऊ घोलप महाविद्यालयाचे एनएसएस व ग्रीन पथक तसेच झापवाडी आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांचे संस्कृती दर्शन लक्षवेधी ठरले. कीर्तनकार, टाळकरी-माळकरी, महिला, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या गजरात शोभायात्रा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून खुले नाट्यगृह येथे संपन्न झाली.

या वेळी विविध राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रस्ताविकात सुभाष पवार यांनी महोत्सवात सुमारे दहा हजार खेळाडू व कलाकार सहभागी होत असून, मुरबाड तालुक्यातील होतकरू खेळाडू व कलाकारांना व्यासपीठ देण्याचा उद्देश असल्याचे सांगितले. प्रमुख पाहुण्यांनी उपक्रमाचे कौतुक केले, तर माजी आमदार गोटीराम पवार यांनी जनसेवा प्रतिष्ठान मुरबाडची सांस्कृतिक परंपरा जपण्यातील भूमिका अधोरेखित केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश शिंदे यांनी केले.

# कॅप्टन ओक हायस्कूलमध्ये क्रीडा व पालक-शिक्षक संघ बक्षीस वितरण





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याणातील बालक मंदिर संस्थेच्या कॅप्टन रवींद्र माधव ओक हायस्कूलचा क्रीडा व पालक-शिक्षक संघाचा बक्षीस समारंभ दि. ३ जानेवारी २०२६ रोजी पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विद्याभूषण हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, दहिसर येथील प्राचार्य मा. श्री. संजय पुंडलिक पाटील उपस्थित होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. दिलीप सलाबत तडवी, पर्यवेक्षक मा. श्री. पंढरीनाथ बाविस्कर, ज्येष्ठ शिक्षक मा. श्री. उत्तम गायकवाड सर, पालक-शिक्षक संघाच्या अध्यक्षा मा. सौ. गायकवाड मॅडम व सहसचिव मा. श्री. अप्पासाहेब शिंदे उपस्थित होते. प्रास्ताविकात मुख्याध्यापक मा. श्री. दिलीप तडवी यांनी क्रीडा स्पर्धांचे महत्त्व विशद केले. प्रमुख पाहुणे मा. श्री. संजय पाटील यांनी शालेय जीवनात खेळांमधून सांघिक भावना निर्माण होऊन जीवनातील अपयश पचविण्याची ताकद मिळते, असे मार्गदर्शन केले. या वेळी शाळेतील सांघिक व वैयक्तिक वार्षिक क्रीडा स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांना शाळा व पालक-शिक्षक संघातर्फे पारितोषिके देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देणाऱ्या मा. श्री. बाळकृष्ण बबन शिंदे यांना 'गुणवंत शिक्षक सन्मान-२०२५' प्रदान करण्यात आला. हा सन्मान मुख्याध्यापक मा. श्री. दिलीप तडवी यांनी सुरू केल्याचे जाहीर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. सौ. मनीषा जाधव यांनी तर आभारप्रदर्शन मा. श्री. उत्तम गायकवाड यांनी केले.

# लाचप्रकरणी कांदळे (पेण) येथील तलाठी अँन्टी करप्शनच्या कारवाईत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता / पेण** : पेण तालुक्यातील मौजे कांदळे येथील सर्व्हे नं. ८९ या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर तक्रारदार व त्यांच्या कुटुंबीयांची नावे नोंदविण्यासाठी ५ हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी आरोपी लोकसेवक महादेव सिताराम धुमाळ (वय ३४) यांच्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. याप्रकरणी तक्रारदाराने २२ डिसेंबर २०२५ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, अलिबाग येथे तक्रार दाखल केली होती. तक्रारीच्या पडताळणीदरम्यान आरोपी लोकसेवकाने स्वतःसाठी तसेच मंडळ अधिकाऱ्यासाठी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. पंच साक्षीदारांच्या उपस्थितीत मोबाईलवर तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयाबाहेर प्रत्यक्ष भेटीत ५ हजार रुपयांची लाच मागितल्याचे व स्वीकारण्यास मान्यता दिल्याचे पंचनाम्यात नमूद करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उप अधीक्षक सरिता भोसले व त्यांच्या पथकाने केली. दरम्यान, कोणत्याही लोकसेवकाकडून लाच मागितली जात असल्यास नागरिकांनी निर्भयपणे अँन्टी करप्शन ब्युरोशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका
## सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६

दिनांक : ९ जानेवारी, २०२६

### जाहिर सूचना

कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने प्रभाग क्रमांक २६ मधील मतदान केंद्र क्रमांक व ठिकाणे जा.क्र. कडोंमपा/सार्व.नि.२०२५-२६/४२२, दि. १९/१२/२०२५ अन्वये नागरीकांच्या अवलोकनासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहेत.

मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील दिनांक २६ जुन, २०२५ रोजीच्या आदेशानुसार मतदान केंद्राची ठिकाणे निवडतांना एका प्रभागातील मतदाराला २ कि.मी. पेक्षा जास्त प्रवास करावा लागू नये अशा रितीने मतदान केंद्राचे ठिकाण निश्चित करणेबाबत मार्गदर्शक सूचना आहेत. मा. निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार प्रभाग क्र. २६, २० व ७ मधील प्रसिध्द करण्यात आलेल्या मतदान केंद्रांचे क्रमांक व ठिकाणांमध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**निवडणूक प्रभाग क्र. २६ मधील मतदान केंद्र क्रमांक व ठिकाणांची दुरुस्ती**

| पुर्वीचे मतदान केंद्र क्र. | सुधारीत केंद्र क्रमांक | मतदान केंद्राचे नांव व ठिकाण |
|---|---|---|
| १ | १४ | कडोंमपा हिंदी माध्यमिक शाळा, तळमजला स्वतंत्र खोली, डोंबिवली पूर्व 421201 |
| २ | १५ | कडोंमपा सयाजीराव गायकवाड मराठी शाळा क्र. 81, तळमजला खोली क्र.1, फतेह अली रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| ३ | १६ | कडोंमपा सयाजीराव गायकवाड मराठी शाळा क्र. 81, तळमजला खोली क्र.2, फतेह अली रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| ४ | १७ | कडोंमपा सयाजीराव गायकवाड मराठी शाळा क्र. 81, तळमजला खोली क्र.3, फतेह अली रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| ५ | १८ | कडोंमपा सयाजीराव गायकवाड मराठी शाळा क्र. 81, तळमजला खोली क्र.4, फतेह अली रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| ६ | १९ | कडोंमपा सयाजीराव गायकवाड मराठी शाळा क्र.81 मंडप पार्टीशन क्र. 1, फतेह अली रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| ७ | २० | कडोंमपा सयाजीराव गायकवाड मराठी शाळा क्र. 81, मंडप पार्टीशन क्र. 2, फतेह अली रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| ८ | २१ | कडोंमपा सयाजीराव गायकवाड मराठी शाळा क्र.81, मंडप पार्टीशन क्र. 3 फतेह अली रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| ९ | २२ | सेठ श्री. के. बी. वीरा हायस्कूल, तळमजला खोली क्र. 1, फतेह अली रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| १० | २३ | सेठ श्री.के. बी. वीरा हायस्कूल, तळमजला खोली क्र.2, फतेह अली रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| ११ | २४ | सेठ श्री. के. बी. वीरा हायस्कूल, तळमजला खोली क्र.3, फतेह अली रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| १२ | २५ | सेठ श्री.के.बी.वीरा हायस्कूल, मंडप पार्टीशन क्र. 1, फतेह अली रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| १३ | २६ | सेठ श्री. के. बी.वीरा हायस्कूल मंडप पार्टीशन क्र. 2 फतेह अली रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| १४ | २७ | आदित्य मंगल कार्यालय, तळमजला पार्टीशन क्र. 1, आगरकर रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| १५ | २८ | आदित्य मंगल कार्यालय, तळमजला पार्टीशन क्र. 2, आगरकर रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| १६ | २९ | आदित्य मंगल कार्यालय, तळमजला पार्टीशन क्र.3, आगरकर रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| १७ | ३० | आदित्य मंगल कार्यालय, तळमजला पार्टीशन क्र.4 आगरकर रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| १८ | ३१ | सी के पी हॉल, तळमजला पार्टीशन क्र. 1, गडकरी पथ, डोंबिवली पूर्व 421201 |
| १९ | ३२ | सी के पी हॉल, तळमजला पार्टीशन क्र. 2, गडकरी पथ, डोंबिवली पूर्व 421201 |
| २० | ३३ | सी के पी हॉल, तळमजला पार्टीशन क्र.3, गडकरी पथ, डोंबिवली पूर्व 421201 |
| २१ | ३४ | मामा निमकर सभागृह (सुयोग मंगल कार्यालय) तळमजला हॉल पार्टीशन क्र. 1, टिळक रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| २२ | ३५ | मामा निमकर सभागृह (सुयोग मंगल कार्यालय) तळमजला हॉल पार्टीशन क्र.2, टिळक रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| २३ | ३६ | मामा निमकर सभागृह (सुयोग मंगल कार्यालय) तळमजला हॉल पार्टीशन क्र.4, टिळक रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| २४ | ३७ | मामा निमकर सभागृह (सुयोग मंगल कार्यालय) तळमजला हॉल पार्टीशन क्र.3, टिळक रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| २५ | ३८ | महावीर हाईटस कडोंमपा हॉल, तळमजला वाहनतळ पार्टीशन क्र. 1, गणेश मंदिर रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| २६ | ३९ | महावीर हाईटस कडोंमपा हॉल, तळमजला वाहनतळ पार्टीशन क्र.2, गणेश मंदिर रोड, डोंबिवली पूर्व 421201 |
| २७ | ४० | आर बी टी विद्यालय हिंदी स्कूल, तळमजला खोली क्र. 1, सावरकर रोड, नेहरू मैदानाजवळ, डोंबिवली पूर्व 421201 |
| २८ | ४१ | आर बी टी विद्यालय हिंदी स्कूल, तळमजला खोली क्र. 2, सावरकर रोड, नेहरू मैदानाजवळ, डोंबिवली पूर्व 421201 |
| २९ | ४२ | आर बी टी विद्यालय हिंदी स्कूल, तळमजला खोली क्र.3, सावरकर रोड, नेहरू मैदानाजवळ, डोंबिवली पूर्व 421201 |
| ३० | ४३ | आर बी टी विद्यालय हिंदी स्कूल, तळमजला खोली क्र. 4, सावरकर रोड, नेहरू मैदानाजवळ, डोंबिवली पूर्व 421202 |
| ३१ | ४४ | संगीता विद्यामंदिर, खोली क्र.1, सिल्वर हेवन अपार्टमेंट, वीर सावरकर रोड, डोंबिवली पूर्व -421201 |
| ३२ | ४५ | संगीता विद्यामंदिर, खोली क्र.2, सिल्वर हेवन अपार्टमेंट, वीर सावरकर रोड, डोंबिवली पूर्व -421201 |
| ३३ | ४६ | संगीता विद्यामंदिर, खोली क्र.3, सिल्वर हेवन अपार्टमेंट, वीर सावरकर रोड, डोंबिवली पूर्व -421201 |
| ३४ | ४७ | स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, तळमजला खोली क्र. 1, गणेश मंदिर पथ, नेहरू मैदान जवळ, डोंबिवली पूर्व 421201 |
| ३५ | ४८ | स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, तळमजला खोली क्र.2, गणेश मंदिर पथ, नेहरू मैदान जवळ, डोंबिवली पूर्व 421201 |
| ३६ | ४९ | स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, मंडप पार्टीशन क्र..1, गणेश मंदिर पथ, नेहरू मैदान जवळ, डोंबिवली पूर्व 421201 |
| ३७ | ५० | स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, मंडप पार्टीशन क्र. 2, गणेश मंदिर पथ, नेहरू मैदान जवळ, डोंबिवली पूर्व 421201 |
| ३८ | १ | कडोंमपा आदर्श विद्यालय, तळमजला खोली क्र. १, राजाजी पथ डोंबिवली पूर्व |
| ३९ | २ | कडोंमपा आदर्श विद्यालय, तळमजला खोली क्र. २, राजाजी पथ डोंबिवली पूर्व |
| ४० | ३ | कडोंमपा आदर्श विद्यालय, तळमजला खोली क्र. ३, राजाजी पथ डोंबिवली पूर्व |
| ४१ | ५१ | आ.ई.एस पाटकर विद्यालय, खोली क्र. ५, राजाजी पथ, डोंबिवली पूर्व |
| ४२ | ५२ | आ.ई.एस पाटकर विद्यालय, खोली क्र. ६, राजाजी पथ, डोंबिवली पूर्व |
| ४३ | ४ | स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, तळमजला खोली क्र.१, आयरे रोड, डोंबिवली पूर्व |
| ४४ | ५ | स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, तळमजला खोली क्र. २, आयरे रोड, डोंबिवली पूर्व |
| ४५ | ६ | स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, तळमजला खोली क्र.३, आयरे रोड, डोंबिवली पूर्व |
| ४६ | ५३ | आ.ई.एस पाटकर विद्यालय, खोली क्र. १, राजाजी पथ, डोंबिवली पूर्व |
| ४७ | ५४ | आ.ई.एस पाटकर विद्यालय, खोली क्र. २, राजाजी पथ, डोंबिवली पूर्व |
| ४८ | ५५ | आ.ई.एस पाटकर विद्यालय, खोली क्र. ३, राजाजी पथ, डोंबिवली पूर्व |
| ४९ | ५६ | आ.ई.एस पाटकर विद्यालय, खोली क्र. ४, राजाजी पथ, डोंबिवली पूर्व |
| ५० | ५७ | आ.ई.एस पाटकर विद्यालय, पहिला मजला खोली क्र. १, राजाजी पथ, डोंबिवली पूर्व |
| ५१ | ५८ | आ.ई.एस पाटकर विद्यालय, पहिला मजला खोली क्र. २, राजाजी पथ, डोंबिवली पूर्व |
| ५२ | ५९ | आ.ई.एस पाटकर विद्यालय, तळ स्टील्ट पार्किंग, राजाजी पथ, डोंबिवली पूर्व |
| ५३ | १० | एस. के. पाटील, खोली क्र. १, टंडण रोड डोंबिवली पूर्व |
| ५४ | ११ | एस. के. पाटील, खोली क्र. २, टंडण रोड डोंबिवली पूर्व |
| ५५ | १२ | एस. के. पाटील, तळमजला पार्टीशन क्र. ३, टंडण रोड डोंबिवली पूर्व |
| ५६ | १३ | एस. के. पाटील, तळमजला पार्टीशन क्र. ४, टंडण रोड डोंबिवली पूर्व |
| ५७ | ७ | राधाबाई साठे विद्यामंदिर, तळमजला खोली क्र. १, राजाजी पथ, डोंबिवली पूर्व |
| ५८ | ८ | राधाबाई साठे विद्यामंदिर, तळमजला खोली क्र. २, राजाजी पथ, डोंबिवली पूर्व |
| ५९ | ९ | राधाबाई साठे विद्यामंदिर, तळमजला खोली क्र. ३, राजाजी पथ, डोंबिवली पूर्व |

**निवडणूक प्रभाग क्र. २० मधील मतदान केंद्र क्रमांक व ठिकाणांची दुरुस्ती**

| केंद्र क्र. | केंद्राचे नांव व ठिकाण | सुधारीत केंद्राचे नांव व ठिकाण |
|---|---|---|
| २०/४९ | श्री. मंगलमुर्ती कॉम्प्लेक्स ए विंग वाहनतळ, बालाजीनगर, ठाकुर्ली स्टेशनजवळ, डोंबिवली (पूर्व) पार्टीशन क्र. १ | न्यू मॉडेल स्कुल, बालाजीनगर, ठाकुर्ली रेल्वे स्टेशन जवळ, डोंबिवली (पू) खोली क्र. १ |
| २०/५० | श्री. मंगलमुर्ती कॉम्प्लेक्स ए विंग वाहनतळ, बालाजीनगर, ठाकुर्ली स्टेशनजवळ, डोंबिवली (पूर्व) पार्टीशन क्र. २ | न्यू मॉडेल स्कुल, बालाजीनगर, ठाकुर्ली रेल्वे स्टेशन जवळ, डोंबिवली (पू) खोली क्र. २ |
| २०/५१ | श्री. मंगलमुर्ती कॉम्प्लेक्स ए विंग वाहनतळ, बालाजीनगर, ठाकुर्ली स्टेशनजवळ, डोंबिवली (पूर्व) पार्टीशन क्र. ३ | न्यू मॉडेल स्कुल, बालाजीनगर, ठाकुर्ली रेल्वे स्टेशन जवळ, डोंबिवली (पू) खोली क्र. ३ |

**निवडणूक प्रभाग क्र. ७ मधील मतदान केंद्र क्रमांक व ठिकाणांची दुरुस्ती**

| केंद्र क्र. | केंद्राचे नांव व ठिकाण | सुधारीत केंद्राचे नांव व ठिकाण |
|---|---|---|
| ७/२९ | इंद्रप्रस्थ को. ऑप. हौ. सोसा, आधारवाडी चौक, क्लब हाऊस, रूम नं.१ कल्याण पश्चिम | नानासाहेब धर्माधिकारी भाजी मंडई, नेबुलापार्क, खडकपाडा रोड, कल्याण (प) |

तरी प्रभाग क्र. २६, २० आणि ७ मधील मतदारांनी उपरोक्त मतदान केंद्राच्या ठिकाणी १५ जानेवारी, २०२६ रोजी मतदानाचा हक्क बजाऊन जबाबदार नागरीक बनावे. मतदान केंद्राची यादी महापालिकेच्या www.kdmc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**जावक क्रमांक :**
**कडोंमपा/जसंवि/मुका/८३४**
**दिनांक :- ०९/०१/२०२६**

**सही/-**
**(अभिनव गोयल) भा.प्र.से.**
**निवडणूक अधिकारी तथा आयुक्त,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका.**

# ठाण्यात प्लास्टिक व चिनी मांजावर कारवाई
## ६ दिवसांत ५३,५०० दंड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (09)** : पतंग उडविण्यासाठी वापरण्यात येणारा चिनी, नायलॉन व प्लास्टिकपासून तयार केलेला सिंथेटिक मांजा मानवी जीवन, पक्षी व पर्यावरणासाठी घातक ठरत असल्याने राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार ठाणे महानगरपालिका क्षेत्रात अशा मांजाच्या विक्री, उत्पादन, साठवण व वापरावर निर्बंध घालण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेने प्लास्टिक व चिनी मांजाविरोधात कडक कारवाई सुरू केली आहे. या कारवाईत गेल्या सहा दिवसांत प्रभाग समितीनिहाय ८५६ आस्थापनांना भेटी देण्यात आल्या. यावेळी ३९.२ किलो प्लास्टिक व ५.५ किलो चिनी मांजा जप्त करण्यात आला असून एकूण ५३,५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आल्याची माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी दिली. चिनी मांजा जैविकरित्या विघटन न होणारा असून जलनिस्सारण व्यवस्था, जलाशय, प्राणी व पक्ष्यांसाठी घातक आहे. तसेच विद्युत वाहक असल्याने अपघात व वीजखंडित होण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे सहाय्यक आयुक्त स्तरावर दक्षता पथकांची स्थापना करून ही कारवाई प्रदूषण नियंत्रण व घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत राबविण्यात येत असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

# कल्याण डोंबिवलीला आनंदी शहर करायचं आहे

## - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे




## कल्याणमध्ये एकनाथ शिंदे यांची विजय संकल्प सभा संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : महायुतीच्या माध्यमातून कल्याण डोंबिवली परिसरात विविध प्रकल्प राबविले जात असून अनेक विकासकामे केली जात आहेत. त्यामुळे कल्याण डोंबिवली या शहरांना आनंदी शहर बनवायचं असल्याचे सांगत कोणी कितीही करूद्या दावेदारी महायुतीच राखणार कल्याणची सुभेदारी असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. कल्याण पश्चिमेतील यशवंतराव चव्हाण क्रीडांगणावर आयोजित विजय संकल्प सभेत एकनाथ शिंदे बोलत होते. यावेळी शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी आमदार नरेंद्र पवार, जिल्हा प्रमुख अरविंद मोरे, शहर प्रमुख रवी पाटील आदींसह महायुतीचे उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलतांना एकनाथ शिंदे यांनी ज्या उमेदवारांच्या पाठीशी महिला त्यांचा नंबर पहिला. लोकसभा, विधानसभा, नगरपालिका निवडणुकी नंतर आता महापालिका निवडणुकीत चौकार षटकार मारायचा आहे. विरोधकांचा सुपडा साफ करायचा आहे. 60 हुन अधिक नगरसेवक निवडून येऊन विजयाची नांदी सुरू झाली आहे. काही लोकं फक्त टीका टिपणी करतात, दुसऱ्यांचा आधार घेऊन काही लोकं मला बुडविण्याचा प्रयत्न करत आहेत. पण आपल्या पाठीशी लाडक्या बहिणी आहेत. आपल्यावर कितीही टीका झाली आरोप झाले तरी या आरोपांना कामातून उत्तर देतो.

काहींनी खुर्चीसाठी बाळासाहेबांच्या विचारांशी प्रतारणा केली. घरी बसून सरकार चालवता येत नाही. लोकांना सामोरे जावे लागते त्यांच्या समस्या सोडवाव्या लागतात. काही लोकं मुंबईकडेच लक्ष लावून बसले आहेत. काहींचा डोळा मुंबईच्या तिजोरीवर असून आमचा डोळा मुंबईच्या विकासावर आहे. निवडणूक आली की मुंबईतील मराठी माणूस आठवतो.

कल्याण हे मुंबईचे शॉकओबजर आहे. मुंबईचा भार हे उपनगर सांभाळत आहेत. पाच वर्षात कल्याण हे आघाडीचे शहर बनवायचं असेल तर महायुतीशिवाय पर्याय नाही. कल्याण डोंबिवली धोकादायक इमारती क्लस्टरच्या माध्यमातून विकसित केल्या जातील. अडीच वर्षाच्या काळात अनेक निर्णय घेतले. सर्वसामान्याचा विकास शहरांचा विकास झाला पाहिजे यांवर लक्ष केंद्रीत केले आहे. अनेक विकासकामे केली जात आहेत.

कल्याण ऐतिहासिक नगरी असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमाराची सुरवात येथून झाली त्याचे स्मारक केलं आहे. ईस्ट या वेस्ट कल्याण झालं बेस्ट. लोकांना न्याय देणाऱ्यांच्या पाठीशी जनता उभी राहते. लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही. रखडलेले पुनर्विकास प्रकल्प म्हाडाच्या माध्यमातून पूर्ण करणार असल्याची ग्वाही यावेळी एकनाथ शिंदे यांनी दिली.

# महापौरपदाची चावी कुणाकडे?

## नालासोपाऱ्यातील १७ प्रभाग ठरणार निर्णायक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई** : वसई विरार महापालिका निवडणूक लढवणाऱ्या ११५ जागांपैकी निम्म्याहून अधिक जागा या नालासोपारा मतदारसंघातील आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत निर्णायक ठरलेला नालासोपारा मतदारसंघ आता वसई विरार महापालिकेच्या महापौर पदाचा दावेदार ठरवणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

वसई विरार महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वसई विरार शहरातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. २०१५ च्या निवडणूकी पेक्षा ही यावेळी होणारी निवडणूक ही अत्यंत चुरशीची ठरणार आहे. वसई विरार महापालिका क्षेत्रात वसई, नालासोपारा आणि बोईसर अशा तीन विधानसभा मतदार संघाचा समावेश होतो. विशेषतः नालासोपारा हा सर्वाधिक मतदार असलेला मतदार संघ आहे. या भागात मराठी मतदारांसह उत्तर भारतीय, मुस्लिम, ख्रिश्चन आणि कोकणातील नागरिकांचे मजबूत समीकरण असून त्यामुळे इथली राजकीय लढत अधिकच रंगतदार ठरत आहे.

महापालिका निवडणुकीसाठी २९ प्रभाग असून ११५ जागा आहे. यातील १७ प्रभाग हे केवळ एकट्या नालासोपारा मतदारसंघात येत असून ११५ पैकी निम्म्याहून नगरसेवक पदाच्या जागा या भागातून निवडून येणार आहेत.

# सोसायटीत प्रचारावरून तू-तू मैं-मैं

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई:** कोपरखैरणे येथील प्रभाग १३ येथे माजी महापौर सागर नाईक, वैष्णवी नाईक, मुनावर पटेल आणि आदिती नाईक हे उमेदवार भाजपकडून रिंगणात आहेत. या चौघांना बिनविरोध निवडून आणायचा प्रयत्न फसल्याने आता भाजपकडून प्रचार रोखण्याचा प्रयत्न होत असल्याची घटना समोर आली आहे. माजी नगरसेवक व माजी महापौर सागर नाईक यांचे वडील ज्ञानेश्वर नाईक यांनी उद्धव ठाकरे गटाच्या उमेदवाराला दमदाटी केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर होत आहे.

नवी मुंबईत चुरशीच्या लढती पैकी एक असणारी कोपरखैरणे पॅनल क्रमांक १३ हि आहे. नवी मुंबईत मुख्य लढत शिवसेना आणि भाजप मध्ये आहे. मात्र या ठिकाणी शिवसेना उमेदवार रामदास पवळे यांचा अर्ज छाननी प्रक्रियेत बाद झाल्याने हि निवडणूक एकतर्फी होईल असे वाटत होते. मात्र उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे राजू आव्हाड यांनी प्रचारात आघाडी घेत आव्हान उभे केल्याचे चित्र आहे. या प्रभागात यापूर्वी शिंदे बाहेर पडण्यापूर्वी असणाऱ्या शिवसेनेचे रामदास पवळे हे नगरसेवक होते.. त्यामुळे या ठिकाणी आजही शिवसेना उबाठा. गटाची ताकद आहे.




कोपरखैरणे १३ क्रमांकाच्या पॅनल मधून भाजपाचे युवा नेते वैभव नाईक यांच्या पत्नी वैष्णवी नाईक, त्यांचे बंधू सागर नाईक, आदिती नाईक आणि माजी नगरसेवक मुनावर पटेल निवडणुकीच्या मैदानात भाजपकडून निवडणूक लढवत आहेत. या प्रभागातील उद्धव ठाकरे यांच्या गटाचे उमेदवार माजी परिवहन समिती सदस्य राजेंद्र आव्हाड यांची प्रचार रॅली सोसायटी ते सोसायटी प्रचार करीत असताना सोसायटीत जाऊन प्रचार करायचा नाही यावरून वाद निर्माण झाले होते. यावेळी ज्ञानेश्वर नाईक यांनी प्रचार करण्यास मज्जाव केला. यावेळी वातावरण तणावपूर्ण झाल्याने पोलिसांनी मध्यस्थी करून वातावरण शांत केले. यावेळी ज्ञानेश्वर नाईक यांच्यावर शिवसेनेतील कार्यकर्ते चांगलेच भडकले. यानंतर प्रचार संपल्यावर उमेदवार राजेंद्र आव्हाड यांनी थेट पोलीस स्टेशन गाठून तक्रार केली. अशी माहिती सूत्रांनी दिली. याबाबत कोपरखैराणे पोलिसांना विचारणा केली असता सोसायातीत प्रचार करण्यावरून तणाव निर्माण झाला होता. दोन्ही कडील नेत्यांना समजुतीने घेण्याचे आवाहन करण्यात आल्यावर वातावरण निवळले. याबाबत ज्ञानेश्वर नाईक यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.








# महापालिकांचा महासंग्राम

# जबाबदार मतदारच सक्षम लोकशाही घडवतो

## सुज्ञ मतदान : सक्षम लोकशाहीकडे नेणारी पहिली पायरी

लोकशाही व्यवस्थेत मतदार हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. प्रत्येक निवडणूक ही केवळ सत्ता बदलण्याची प्रक्रिया नसून समाजाच्या भविष्याची दिशा ठरवणारी घटना असते. म्हणूनच मतदान हा अधिकार जितका महत्त्वाचा आहे, तितकीच त्यामागील जबाबदारीही मोठी आहे. सजग, विचारपूर्वक आणि जबाबदारीने केलेले मतदानच सक्षम लोकशाहीची पायाभरणी करते. निवडणूक काळात उमेदवारांकडून अनेक आश्वासने दिली जातात. विकास, रोजगार, सुविधा, योजना यांची यादी मतदारांसमोर ठेवली जाते. मात्र मतदारांनी केवळ आकर्षक घोषणांवर न थांबता उमेदवारांचा आतापर्यंतचा कार्यकाळ, सामाजिक व सार्वजनिक जीवनातील वर्तन, प्रामाणिकपणा आणि जनतेशी असलेला संबंध याचा सखोल विचार करणे आवश्यक आहे. शब्दांपेक्षा कृती महत्त्वाची असते, हे मतदारांनी लक्षात ठेवले पाहिजे.

खरा जनप्रतिनिधी तोच असतो, जो निवडणुकीनंतरही जनतेच्या संपर्कात राहतो. नागरिकांच्या समस्या ऐकून घेऊन त्यावर उपाययोजना करण्याचा प्रयत्न करतो. प्रशासनाशी समन्वय साधून कामे मार्गी लावतो आणि निर्णय घेताना वैयक्तिक स्वार्थाऐवजी समाजहिताला प्राधान्य देतो. पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकांप्रती बांधिलकी ही चांगल्या नेतृत्वाची ओळख आहे.

मतदान करताना मतदारांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी, भ्रष्टाचाराची छाया किंवा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींपासून दूर राहिले पाहिजे. अशा प्रवृत्तींना मत देणे म्हणजे स्वतःच्या आणि पुढील पिढीच्या भविष्याशी तडजोड करण्यासारखे आहे. स्वच्छ चारित्र्य, सुसंस्कृत वर्तन आणि कायद्याचा आदर करणारे उमेदवारच सुशासन देऊ शकतात.

सुशिक्षित, संवेदनशील आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन असलेला उमेदवार समाजाच्या विकासाला चालना देतो. शेतकरी, कामगार, महिला, युवक, विद्यार्थी, व्यापारी, ज्येष्ठ नागरिक अशा सर्व घटकांचा समतोल विकास साधण्याची दृष्टी त्याच्याकडे असते. केवळ एखाद्या गटापुरते मर्यादित न राहता संपूर्ण समाजाचा विचार करणारा नेता खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी ठरतो.

शेतकऱ्यांच्या अडचणी, शिक्षण व आरोग्याच्या सुविधा, पायाभूत विकास, रोजगाराच्या संधी, महिला सुरक्षा, पर्यावरण संवर्धन अशा मुद्द्यांवर ठोस भूमिका घेणारा आणि त्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारा उमेदवार निवडणे हे मतदारांचे कर्तव्य आहे. समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी सक्षम, दूरदृष्टी असलेले नेतृत्व आवश्यक आहे.

मतदारांनी कोणत्याही आमिषांना, दबावांना किंवा भावनिक आवाहनांना बळी न पडता विवेकबुद्धीने निर्णय घ्यावा. आपले एक मत हे अत्यंत मौल्यवान आहे. ते केवळ एखाद्या व्यक्तीला सत्तेत बसवत नाही, तर पुढील अनेक वर्षांसाठी धोरणे, निर्णय आणि विकासाची दिशा ठरवते.

म्हणूनच, जबाबदारीने काम करणारा, प्रामाणिकपणे जनसेवा करणारा, लोकांच्या भावना जपणारा आणि सुशासन घडवून आणणारा उमेदवारच निवडून द्या. कारण सुज्ञ मतदारच सक्षम, स्वच्छ आणि प्रगत लोकशाहीचा खरा शिल्पकार असतो.

## सुशिक्षित, भ्रष्टाचारमुक्त आणि सुशासन देणाऱ्या उमेदवार निवडा

लोकशाहीमध्ये मतदान हा केवळ अधिकार नसून तो देशाच्या भविष्यासाठी घेतलेला जबाबदार निर्णय असतो. त्यामुळे मत देताना भावनांपेक्षा विवेक आणि मूल्यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. आज देशासमोर शिक्षण, रोजगार, आरोग्य, शेती आणि सामाजिक समतेसारखी आव्हाने आहेत. या समस्यांवर योग्य निर्णय घेण्यासाठी सुशिक्षित आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व महत्त्वाचे ठरते. शिक्षणामुळे उमेदवारामध्ये जबाबदारी, आधुनिक विचार आणि प्रभावी निर्णयक्षमता निर्माण होते. भ्रष्टाचारामुळे विकास खुंटतो आणि सामान्य नागरिकांचा विश्वास कमी होतो. त्यामुळे प्रामाणिक, पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त उमेदवार निवडणे अत्यावश्यक आहे. सुशासन म्हणजे नागरिकांच्या समस्या वेळेत सोडवणे, न्याय्य निर्णय घेणे आणि प्रशासन लोकाभिमुख बनवणे. असे सुशासन देणारे नेतृत्वच समाज आणि देशाला प्रगतीच्या मार्गावर नेऊ शकते. म्हणूनच, देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी सुशिक्षित, भ्रष्टाचारमुक्त आणि सुशासन घडवून आणणाऱ्या उमेदवारालाच मत द्या.

## समाजातील सर्व घटकांचा समतोल साधून विकसित देशाचा विचार करणाऱ्या उमेदवाराला मत द्या

लोकशाही व्यवस्थेत मतदान हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आणि तितकाच महत्त्वाचा सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्य आहे. आजचा भारत तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. नवीन पिढी ही केवळ स्वप्ने पाहणारी नाही, तर ती प्रश्न विचारणारी, बदल घडवू इच्छिणारी आणि भविष्य घडवण्याची ताकद असलेली पिढी आहे. त्यामुळे देशाच्या नेतृत्वाची निवड करताना नवीन पिढीच्या गरजा आणि सर्व समाजघटकांचा समतोल साधणारा दृष्टिकोन असलेला उमेदवार निवडणे अत्यंत आवश्यक आहे.

नवीन पिढीला दर्जेदार शिक्षण, रोजगाराच्या संधी, कौशल्यविकास, आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल सुविधा आणि सुरक्षित भविष्य हवे आहे. परंतु विकास केवळ तरुणांपुरता मर्यादित नसून, शेतकरी, कामगार, महिला, ज्येष्ठ नागरिक, ग्रामीण भाग, वंचित आणि दुर्बल घटक यांच्या समस्या समजून घेणे आणि त्यावर उपाययोजना करणे तितकेच महत्त्वाचे आहे. सर्व समाजघटकांचा समतोल राखल्याशिवाय खरा आणि टिकाऊ विकास शक्य नाही.

विकसित देशाची संकल्पना केवळ मोठ्या इमारती, रस्ते किंवा आकड्यांपुरती मर्यादित नसते. ती संकल्पना समान संधी, सामाजिक न्याय, आर्थिक स्थैर्य, पर्यावरण संरक्षण आणि मानवी मूल्यांवर आधारित असते. शिक्षण आणि आरोग्य सर्वांसाठी सुलभ असणे, शेती आणि उद्योग यांचा समन्वय साधणे, महिलांना सुरक्षितता व समान संधी देणे, तसेच पर्यावरणाचा ऱ्हास रोखणे—या सर्व बाबींचा समतोल विचार करणारे नेतृत्वच देशाला खऱ्या अर्थाने विकसित करू शकते.

फक्त आश्वासनांची पेरणी करणारे नव्हे, तर प्रामाणिकपणे काम करणारे, भ्रष्टाचारापासून दूर राहणारे, समाजात तेढ निर्माण न करता एकता आणि सौहार्द जपणारे उमेदवार निवडणे ही आजच्या मतदारांची जबाबदारी आहे. व्यक्तीपूजा किंवा भावनिक घोषणांपेक्षा विचार, कार्यक्षमता आणि दूरदृष्टी महत्त्वाची ठरते.

आज दिलेले मत हे उद्याच्या भारताचे भविष्य ठरवते. म्हणूनच नवीन पिढीच्या आकांक्षा आणि सर्व समाजातील विषयांचा समतोल साधून विकसित देशाचा विचार करणाऱ्या, जबाबदार आणि दूरदृष्टी असलेल्या उमेदवारालाच मत द्या. हाच लोकशाहीचा खरा अर्थ आणि मजबूत, विकसित भारताकडे जाण्याचा योग्य मार्ग आहे.

## प्रलोभनांना बळी पडू नका

### भविष्यास सुरक्षित ठेवा

निवडणुकीच्या काळात अनेक उमेदवार तात्पुरख्या प्रलोभनांचे आमिष दाखवतात. मात्र अशा प्रलोभनांना बळी पडून मत देणे म्हणजे आपल्या आणि येणाऱ्या पिढ्यांच्या भविष्यास धोका निर्माण करणे होय. खरा लोकप्रतिनिधी तोच असतो जो शब्दांपेक्षा कामावर विश्वास ठेवतो. त्यामुळे मत देताना उमेदवाराची प्रामाणिकता, पूर्वी केलेली कामे, जनतेशी असलेली नाळ आणि समाजासाठीची तळमळ यांचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. क्षणिक फायद्यांपेक्षा दीर्घकालीन विकास महत्त्वाचा आहे. योग्य निर्णयातूनच सुशासन, पारदर्शकता आणि समृद्ध समाज घडू शकतो. म्हणूनच, थोड्या प्रलोभनांना बळी न पडता उमेदवाराचा प्रामाणिकपणा आणि कार्य पाहूनच मत द्या — कारण तुमचे मतच तुमचे भविष्य घडवते.



# भिवंडीत प्रचार सभेदरम्यान वाद ▌ दोन्ही गटांवर गुन्हे दाखल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता /भिवंडी** : भिवंडी शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये कोणार्क विकास आघाडीच्या प्रचार रॅलीदरम्यान भाजप समर्थकांनी सभेत घुसून महिलांना शिवीगाळ व धमकावल्याची घटना बुधवारी (७) रात्री कोंबडपाडा येथील गणपती मंदिर परिसरात घडली. याप्रकरणी मध्यरात्रीनंतर भिवंडी निजामपूरा पोलीस ठाण्यात भाजप पदाधिकारी व समर्थकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोणार्क विकास आघाडीचे उमेदवार प्रचार रॅली करत असताना १० ते १२ जणांनी सभेत घुसून गोंधळ घातल्याचे सांगण्यात आले. विशेष म्हणजे घटनास्थळी पोलीस बंदोबस्त असतानाही सुरुवातीला कोणतीही कारवाई झाली नाही. त्यानंतर ११२ क्रमांकावर फोन केल्यानंतर पोलिसांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. दरम्यान, रात्री उशिरा माजी महापौर प्रतिभा पाटील समर्थक महिलांसह पोलीस ठाण्यात दाखल होऊन तक्रार दाखल केली. त्यानंतर परस्परविरोधी तक्रारीनुसार दोन्ही गटांविरोधात गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. महिलांना शिवीगाळ व धमकावण्याच्या प्रकाराचा निषेध व्यक्त करण्यात येत आहे.

# खानीवली-शिरीषपाडा रस्त्यासाठी जनआंदोलन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाडा** : खानीवली ते शिरीषपाडा हा तालुक्याला जोडणारा मुख्य मार्ग सध्या नागरिकांसाठी मृत्यूचा सापळा ठरत आहे. रस्त्यावर जागोजागी मोठे खड्डे पडल्याने वाहनचालक, दुचाकीस्वार, शालेय विद्यार्थी व पादचाऱ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर सोमवारी (दि. १२ जाने) सकाळी १० वाजता खानीवली–निचोळे रोड परिसरात खड्डे विरोधी जनआंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन स्थानिक तरुणांनी शासन दरबारी सादर केले आहे. हे आंदोलन सार्वजनिक बांधकाम विभाग व ठेकेदारांच्या निष्काळजीपणाविरोधात असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. नागरिकांचा आरोप आहे की, फायलींमध्ये रस्ता 'पूर्ण' दाखवला जातो; मात्र प्रत्यक्षात खड्ड्यांनी भरलेला रस्ता दिसतो. निधी मंजूर होऊनही काम अपूर्ण राहते आणि कागदावर विकास, प्रत्यक्षात भकास अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. खड्डे भरण्याची कामे वेळेत पूर्ण न झाल्याने वाहनांचे नुकसान होत असून जीवितहानीचा धोका वाढला आहे. "आपला रस्ता-आपली



जबाबदारी" या भूमिकेतून सर्व स्थानिक युवक व नागरिकांनी रस्त्यावर उतरून आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या आंदोलनाद्वारे प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, निकृष्ट कामाची चौकशी करावी व रस्ता त्वरित दुरुस्त करावा, अशी मागणी येथील तरुणांनी केली आहे.

# केडीएमसी निवडणुकीचा मुख्य निवडणूक निरीक्षकांकडून आढावा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 साठी नियुक्त करण्यात आलेले मुख्य निवडणूक निरीक्षक निलेश गोरख सागर यांनी महापालिका सार्वत्रिक निवडणूकीचा सर्वंकष आढावा घेतला. यावेळी निवडणूक निरीक्षक पद्माकर रोकडे, महापालिकेचे निवडणूक अधिकारी तथा आयुक्त अभिनव गोयल, अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, कल्याण परिमंडळ-3 चे पोलीस उपआयुक्त अतुल झेंडे, कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीसाठी नियुक्त सर्व नोडल ऑफिसर तसेच निवडणूकीसाठी प्रभागनिहाय नियुक्त केलेले निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधिकारी वर्ग, आरटीओ अधिकारी तसेच इतर अधिकारी वर्ग उपस्थित होता.




मुख्य निवडणूक निरीक्षकांनी महापालिकेतर्फे निवडणूकीकामी सुरु असलेल्या तयारीबाबत चर्चा केली. VOTERS TURNOUT च्या नोंदी व्यवस्थित घ्याव्यात. कर्मचाऱ्यांच्या मनात कुठलाही संभ्रम राहू नये, अशा प्रकारे प्रशिक्षणाचे आयोजन, नियोजन करावे. REPORTING अचूक असावे. तसेच DISPACTH व रिसीव्हींग चे काम कुशलतेने करण्यात यावे, असे संबोधत सर्व उपस्थित अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांस मार्गदर्शन केले.

या बैठकीत महापालिका निवडणूक अधिकारी तथा आयुक्त अभिनव गोयल यांनी निवडणूकीच्या तयारीची माहिती दिली. त्याचप्रमाणे निवडणूकीसंदर्भातील तयारीचे पीपीटी द्वारे सादरीकरण यावेळी करण्यात आले. कल्याण परिमंडळ-3 चे पोलीस उपआयुक्त अतुल झेंडे यांनी पोलीस विभागामार्फत सुरु असलेल्या आणि करण्यात आलेल्या प्रत्यक्ष निवडणूकीपूर्वी, मतदान व मतमोजणी दिवशी पोलीस विभागामार्फत करण्यात आलेल्या तयारीची/बंदोबस्ताची माहिती विषद केली.

# महिला व बाल विकास कार्यालयाने दोन बालविवाह रोखले

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता /पेण** : महाड तालुक्यातील नांदगाव खुर्द येथील दोन अल्पवयीन बालिकांचे बालविवाह होणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय यांनी नांदगाव ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी, महाड शहर पोलीस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक व कनिष्ठ संरक्षण अधिकारी यांच्या संयुक्त पथकाच्या समन्वयाने होणारे 2 बालविवाह थांबवले. कनिष्ठ संरक्षण अधिकारी यांना बालविवाह बाबत गोपनीय माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी मुलींच्या वयाची खात्री केली असता त्या दोन्ही मुलींचे वय अनुक्रमे 16 वर्षे 8 महिने व 16 वर्षे 1 महिना असल्याचे आढळून आले. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम 2006 नुसार मुलीचे विवाहाचे वय किमान 18 वर्षे मुलाचे वय 21 वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे त्यामुळे सदर विवाह बालविवाह असून तो कायद्याने बेकायदेशीर ठरत होता त्यामुळे वरील माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी जाऊन बालविवाह थांबवला. या प्रकरणी अल्पवयीन बालकांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे समुपदेशन करून बालिकांचे वय 18 पूर्ण झाल्याशिवाय त्यांचा विवाह करणार नाही याबाबत बंध पत्र लिहून घेण्यात आले. अल्पवयीन मुलींना जिल्ह्याच्या बालकल्याण समितीच्या समोर सादर करण्यात येणार आहे. जर आपल्या गावात बालविवाह होत असल्यास चाइल्ड हेल्पलाइन 1098 ला माहिती द्यावी. माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गुप्त ठेवण्यात असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी रायगड श्रीकांत हावळे यांनी केले आहे.

# प्रभाग 8 ब मध्ये समीना सलीम शेख यांना जनसमर्थन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता / कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक 8 ब मधून अधिकृत उमेदवार समीना सलीम शेख यांना नागरिकांकडून उत्स्फूर्त व अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. प्रचार दौऱ्यादरम्यान परिसरातील महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक व तरुणाईने मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला पाठिंबा जाहीर केला. स्थानिक प्रश्नांची जाण, सर्वसमावेशक विकासाची भूमिका आणि जनतेशी थेट संवाद यामुळे समीना सलीम शेख यांच्याबद्दल नागरिकांमध्ये विशेष विश्वास निर्माण झाला आहे.



"विकास, पारदर्शकता आणि सर्वसामान्यांचा आवाज महापालिकेत पोहोचवणार" असा विश्वास त्यांनी नागरिकांना दिला. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, महिला-सुरक्षा व युवकांसाठी संधी निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला. या प्रचारादरम्यान नागरिकांकडून "प्रभाग 8 ब मध्ये बदल हवा, सक्षम नेतृत्व हवं" अशा घोषणा देत उत्साहाने सहभाग नोंदवण्यात आला. वाढता जनसमर्थन पाहता प्रभाग क्रमांक 8 ब मध्ये निवडणूक रंगतदार होत असल्याचे चित्र आहे.

# राज ठाकरेंच्या आदेशानंतर भिवंडीत मनसेचा संताप
## धाब्याचा नामफलक फाडला




भिवंडी ( प्रतिनिधी ) सध्या ठाणे, कल्याण व भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रात निवडणूक प्रचार रॅली व सभांची रणधुमाळी जोमात सुरू असुन प्रचारासाठी भाजप, शिवसेनेसह सर्वच राजकीय पक्षांचे नेते ठिकठिकाणी प्रचारासाठी भेटी देत आहेत. अशाच भेटीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राज ठाकरे हे कल्याणहून प्रचार संपवून भिवंडी मार्गे ठाण्याच्या दिशेने जात असताना त्यांची नजर ठाणे भिवंडी सीमेवरील खारीगाव खाडी च्या ब्रिज नजीक असलेला "बॉम्बे ढाब्या" वर गेली.जेथे अजूनही बॉम्बे ढाबा हे नाव
इंग्रजीत असल्याचे दिसून आले त्यामुळे त्यांनी सोबत असलेलेल ठाणे व पालघर जिल्हाप्रमुख अविनाश जाधव यांच्या लक्षात ही बाब आणून दिली.त्यांनी दिलेल्या आदेशानंतर महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना ठाणे जिल्हाप्रमुख परेश चौधरी आपल्या सहकाऱ्यांसह बॉम्बे ढाबा येथे दाखल होत.ढाबा व्यवस्थापकास येथील नाव तत्काळ बदलण्याच्या,येथील विद्युत साईन बोर्ड बंद करण्यास सांगून न थांबता मनसे सैनिकांनी येथील नामफलक फाडून आपला संताप व्यक्त केला आहे.या आंदोलनात अँड.सुनील देवरे, मिलिंद तरे,पुरुषोत्तम म्हात्रे,अविष पाटील, कुमार पुजारी,मंगेश म्हात्रे,शुभम घोडके,राकेश पाटील, यश गुळवी सहभागी झाले होते.

# प्री व पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती अर्ज सुरू

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता / रायगड** : सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांनी विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता दि.5 मे 2022 रोजीच्या पत्रान्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्यामार्फत भारत सरकारच्या PM-YASASVI (Young Achievers Scholarship Award Scheme for Vibrant India) या एकत्रित शिष्यवृत्ती योजनेच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांची राज्यात अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. याकरिता राज्यातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्री-मॅट्रीक व पोस्ट मॅस्ट्रिक शिष्यवृत्तीचा लाभ उपलब्ध असून पात्र विद्यार्थ्यांनी NPS (National Scholarship Portal) करिता अर्ज सादर करावेत असे आवाहन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण रायगड-अलिबाग सुनिल जाधव यांनी केले आहे.
प्री-मॅट्रीक शिष्यवृत्ती इयत्ता 9 वी व इयत्ता 10 वी :- लागू प्रवर्ग ओबीसी, व्हीजेएन्टी,डीएनटी, एसबीसी, शाळा शासनमान्य असणे आवश्यक, वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.2 लाख 50 हजार, किमान उपस्थिती 75 टक्के, इतर शिष्यवृत्ती घेता येणार नाही, शिष्यवृत्ती रक्कम रु.4 हजार वार्षिक, दोन मुलांपर्यंत लाभ (मुलींसाठी मर्यादा नाही.).
पोस्ट मॅस्ट्रिक शिष्यवृत्ती इयत्ता 11 वी ते पदव्युत्तर/व्यावसायिक अभ्यासक्रम :- लागू प्रवर्ग ओबीसी, व्हीजेएन्टी,डीएनटी, एसबीसी, वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.2 लाख 50 हजार, किमान उपस्थिती 75 टक्के, एफआरए/मान्य प्राधिकरण मान्य अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती, रक्कम डिबीटीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या आधार लिंक बँक खात्यात, अभ्यासक्रम मध्यंतरी सोडल्यास शिष्यवृत्ती रद्द व रक्कम परत करावी लागेल.
अर्ज प्रक्रिया NPS (National Scholarship Portal), विद्यार्थ्यांना https://scholarship.gov.in, या संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक. अर्ज करताना जात प्रमाणपत्र, जातवैधता (लागू असल्यास), उत्पन्न प्रमाणपत्र, आधार लिंक बँक खाते,बोनफाईड प्रमाणपत्र, मागील वर्षाचे गुणपत्रक, Aadhar Authenticated Attendance-75 टक्के ही कागदपत्रे आवश्यक आहेत.
रायगड जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन अर्ज प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यास सहकार्य करावे, सर्व पात्र विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहू नयेत.

# कराटे स्पर्धेत पूर्णप्रज्ञा सरस्वती विद्यार्थ्यांची चमक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता / मुंबई**

दिनांक ०४.०१.२०२६, विरार मुंबई येथे राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन संघटना (NSPO) असलेल्या STAIRS फाउंडेशनने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांची मालिका सुरू करण्यात आली आहे.लहान शहरांतील शालेय विद्यार्थ्यांमधून होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्यातील क्रीडा प्राविण्याला संधी उपलब्ध करून देण्यासाठी सादर संस्था कार्य करत असते.

स्थानिक क्रीडा टप्प्यांपासून राष्ट्रीय क्रीडा टप्प्यांपर्यंत प्रगती करण्यासाठी तरुण खेळाडूंना एक उत्कृष्ट असा संरचित मार्ग प्रदान करण्याचा संस्थेचा मानस असल्याने तळागाळातील खेळाडूना योग्य ती संधी देऊन त्यांना प्रोत्साहन देतांना त्यांना क्रीडा क्षेत्रात पुढे तांत्रिक आणि शास्त्रीय पद्धतीने पुढे जाण्यासाठी मदत करून,देशासाठी योग्य खेळाडू घडविण्याचे ध्येय ठेवून ही संस्था काम करते.




जिल्हा पातळीपासून वरच्या स्तरावरील प्रतिभेची ओळख करून त्या खेळाडूंचा विविध क्रीडा प्रकारातील त्यांच्या नैपुण्याला आणखी विकसित करण्यात कोणतीच कसर ठेवली जात नाही. सदर संस्थेकडून बहु-क्रीडा कार्यक्रम राबविण्यात येतात,जसे की फुटबॉल, ॲथलेटिक्स, क्रिकेट, बास्केटबॉल, बुद्धिबळ, कराटे आणि बरेच काही यासारख्या खेळांचा समावेश असतो.

युवा सक्षमीकरण: खेळांद्वारे कौशल्य विकास, सांघिक कार्य आणि समावेशक विकासाला प्रोत्साहन देणे.त्यातून यशस्वी राज्यस्तरीय आणि देशपातळीवर खेळाडू तयार व्हावे हे STAIRS चे ध्येय आहे.
ह्याच अनुषंगाने टिटवाळयातील दिलासा फाउंडेशन संचालित पूर्णप्रज्ञा सरस्वती इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत कराटे खेळात मोठे यश मिळवून शाळेचे नाव चमकावले आहे.

### सहभागी विद्यार्थ्यांचे नाव आणि पदक

1) श्रुती जैस्वाल - काटा इव्हेंट - गोल्ड
कुमिते इव्हेंट (फाइट) - ब्रॉंझ
2) अनिकेत शर्मा - काटा इव्हेंट - सिल्वर
कुमिते इव्हेंट (फाइट)- गोल्ड
3) जाहिरा शेख - काटा इव्हेंट ब्रॉंझ
कुमिते स्पर्धा (लढाई) - सिल्वर
4) शाहिन खान - काटा इव्हेंट - गोल्ड
कुमिते स्पर्धा (लढाई) - गोल्ड
5) सुलतान काझी - काटा इव्हेंट - ब्रॉंझ
कुमिते इव्हेंट (लढाई) - ब्रॉंझ

आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठे यश मिळविल्याबद्दल दिलासा फाउंडेशनच्या सचिव डॉ.पद्मिनी कृष्णा यांनी आनंद व्यक्त करतांना विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.
ह्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे श्री. शैलेश देठे ,श्री. अजय कुमार आणि प्रभारी, सहअभ्यासक्रम उपक्रम राबविणारे श्री. विशाल यादव, व श्रीमती नेहा दिघे यांनी मोठा सहभाग घेऊन ह्या विद्यार्थ्यांना घडविण्यात मोलाचा वाटा उचलला असल्याचे डॉ.पद्मिनी कृष्णा यांनी सांगितले.

# गावठी कट्टा व काडतूससह इसमास बाजारपेठ पोलिसांकडून अटक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन सुरु असून याच दरम्यान बाजारपेठ पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक प्रशांत आंधळे यांना बाजारपेठ पो. स्टे. अंतर्गत दाखल असलेल्या गुन्ह्यातील पाहिजे असलेला आरोपी शफिक गफुर सैय्यद उर्फ बगला, हा दुर्गामाता मंदिराच्या मागील बाजुस लोखंडी ब्रिजच्या खाली देशी बनावटीचा गावठी कट्टा घेवुन कारमध्ये फिरत असल्याची बातमी मिळाल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेशसिंग गौड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशांत आंधळे व डी.बी.स्टाफ यांनी सापळा लावून शफिक गफुर सैय्यद उर्फ बगला ताब्यात घेतले असता त्याच्याकडून एक देशी बनावटीचा लोखंडी गावठी कट्टा, २ जिवंत काडतुस व एक स्कोडा कार जप्त करण्यात आली आहे.आरोपीकडून ४० हजार रूपये किमतीचा देशी बनावटीचा लोखंडी गावठी कट्टा, ८०० रुपयांचे एकुण २ जिवंत काडतुस आणि दोन लाख रुपये किंमतीची एक स्कोडा कार असा एकूण २ लाख ४० हजार ८०० किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून, या आरोपीला अटक करुन न्यायालयात हजर करण्यात आलेले आहे. हि कामगिरी पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे, सहा. पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनिरी सुरेशसिंग गौड, पो. निरीक्षक डुकळे, गुन्हे प्रकटिकरण पथकाचे सपोनिरी प्रशांत आंधळे, सपोउपनिरी सुरेश पाटील, पो.हवा. पी. एम. बाविस्कर, एम. आर. चित्ते, बी. आर. बागुल, आर. एस. भालेराव, आर. जी. पाटील, पो.शि. ओ. बी. आंधळे, आर. ओ. ईशी यांनी केली आहे.

# गंधर्व गुरुकुलचा स्नेहसंमेलन उत्साहात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : गंधर्व गुरुकुलचा नेत्र दीपक आठवा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा अतिशय उत्साहात नुकताच पार पडला. विद्यार्थ्यांच्या कला, नृत्य, गायन व नाट्य सादरीकरणाने सर्वांची मने जिंकली. प्रत्येक सादरीकरणातून शिक्षकांनी मुलांवर घेतलेली मेहनत आणि तितक्याच तन्मयतेने विद्यार्थ्यांनी घेतलेल्या परिश्रमाचा आणि रियाज याचा प्रत्यय सर्वांना आला. 'श्रीराम' हा विषय घेऊन सादर करण्यात आलेल्या या स्नेहसंमेलनात श्रीराम हा धर्म नाही तर जीवनाच्या दृष्टिकोन आहे आणि ह्या नामाच्या जपाने होणारे शारीरिक आणि मानसिक फायदे पालक आणि मुलांपर्यंत पोहोचवण्यात गंधर्व गुरुकुल यशस्वी झाले.
गजानन पंडीत गुरुजी यांच्या वैदिक मंत्रोच्चारात झालेली कार्यक्रमाची सुरुवात, डॉ प्रमोद नांदगावकर



यांनी मोजक्या व मुद्देसूद शब्दात सादर केलेली गंधर्व गुरुकुलाची वाटचाल, प्रभू रामचंद्रांचा प्रेरणात्मक विषय घेऊन गंधर्व गुरुकुल शिक्षिका पूर्वा शिंपी यांचे मुद्देसूद व लाघवी सूत्रसंचालन, बैठक व्यवस्था, गायन, हार्मोनियम, कीबोर्ड, भरतनाट्यम, कथ्थक, वेस्टन डान्स, बासरी, तबला याचे लाईव्ह परफॉर्मन्स आणि त्याला लाभलेली वादकांची उत्तम साथ लाभली.
विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्याची उत्तम संधी मिळाली. पालकांनीही कार्यक्रमाचे मनापासून कौतुक केले. स्नेहसंमेलनामुळे सर्वांमध्ये एकोप्याची भावना निर्माण झाली. या कार्यक्रमामुळे शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्यातील स्नेह अधिक दृढ झाला, अशी आणि अशाच अनेक प्रेरणादायी पोहच पावत्या पालकांनी दिल्या. या कार्यक्रमाला कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रविंद्र घोडविंदे, पाटील, जोशी, शीला नांदगावकर, सुधा जानविलकर, खिसमतराव, संदीप रेडकर, शीतल रेडकर, नितीन नांदगावकर, भूमी नांदगावकर, डॉ सचिन सातपुते, सन्नी नागदेव, डॉ सिद्धेश्वर चामनारू, ॲड. विलास भारती, तुषार शिंपी, दामोदर धोरडे महाराज, प्रशांत दीक्षित, विवेकानंद झरे, प्रवीण वाणी, मुकुंद नावकर, अमर धनावडे अशा अनेक मान्यवर आणि मित्रमंडळींनी कार्यक्रमाला उपस्थिती दाखवत मुलांचे कौतुक केले.
हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतलेल्या सर्व शिक्षक मयूर सावर्डेकर, सिद्धी सावर्डेकर, ओमकार लवांदे, प्रशांत सावंत, सुनील गोडांबे, कोमल गायकवाड पाटील, कोमल नागावेकर जाधव, अनंता तरणे, पराग वाणी आणि पालकांचे आभार मानून गंधर्व गुरुकुलच्या संचालिका वैदेही नांदगावकर यांनी कार्यक्रमाची सांगता केली.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024